महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**

७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०

दूरध्वनी क्रमांक: (020) 2447 6938 E-mail: researchdept@maa.ac.in


जा.क्र.राशैसंप्रपम/संशोधन/नवोपक्रम स्पर्धा/२०२३-२४/05903 दि. ~~०७~~ ०८/१२/२०२३

**प्रति,**

1. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, (सर्व)
2. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
3. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, (सर्व)
4. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, (सर्व)
5. शिक्षण निरीक्षक, मुंबई
6. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, (सर्व)

**विषय:** राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२३-२४ साठी नवोपक्रम सादर करणे करिता मुदतवाढ देणेबाबत...

**संदर्भ:** 1. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र,जा.क्र.राशैसंप्रपम/संशोधन/नवोपक्रम स्पर्धा/२०२३-२४/०५१६४
2. प्रस्तुत कार्यालयाची मान्य टिपणी दिनांक २४/११/२०२३
3. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र,जा.क्र.राशैसंप्रपम/संशोधन/नवोपक्रम स्पर्धा/२०२३-२४/५५९८ दि-२४।११।२०२३
4. प्रस्तुत कार्यालयाची मान्य टिपणी दिनांक ०७/१२/२०२३

उपरोक्त संदर्भान्वये राज्यातील शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक, पर्यवेक्षकीय अधिकारी, विषय साधन व्यक्ती, विषय सहायक, ग्रंथपाल, अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका यांच्याद्वारे विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्य केले जात आहे. त्यांच्या या नवोपक्रमशीलतेला व सृजनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी सन २०२३-२४ मध्ये राज्यस्तरावर नवोपक्रम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धकांना आपले नवोपक्रम https://scertmaha.ac.in/innovation/ या लिंकवर सादर करण्यासाठी १० डिसेंबर २०२३ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

अनेक स्पर्धकांनी नवोपक्रम अहवाल सादर करण्याविषयी मुदतवाढ मिळावी अशी मागणी सदर कार्यालयाकडे केलेली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त स्पर्धकांनी यामध्ये सहभागी व्हावे यासाठी **दि.२० डिसेंबर २०२३** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. जेणेकरून सदर स्पर्धेत इच्छुक स्पर्धकांना सहभागी होण्याची संधी मिळेल. त्यानुसार आपल्या अधिनस्त शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक, पर्यवेक्षकीय अधिकारी, विषय साधन व्यक्ती, विशेष साधन व्यक्ती, विषय सहायक , ग्रंथपाल, अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका यांना https://scertmaha.ac.in/innovation/ या लिंकवर **दि. २० डिसेंबर २०२३** पर्यंत आपले नवोपक्रम अहवाल सादर करण्याविषयी सूचित करण्यात यावे. सदर स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा यासाठी आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**डॉ. कमलादेवी आवटे**
उपसंचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे ३०.

Scanned with OKEN Scanner